## हनुमान जयंतीनिमित्त तुकडोजी महाराजांच्या अस्थींचे परसवाडा आश्रमात आगमन

**महासागर प्रतिनिधी**

**गोबरवाही :** परसवाड्यातील श्री गुरुदेव धाम, मानव कल्याण सेवा आश्रम, श्री तीर्थ क्षेत्र शनिवार दिनांक १२/४/२०२५ रोजी श्री हनुमान जन्मोत्सव व ग्रामजयंतीच्या शुभ मुहूर्तावर राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या अस्थिकलशाचे गुरुकुंज, मोजरी येथून आगमन होत आहे.

शनिवारी सकाळी ११:०० वाजता, आश्रमात अस्थिकलशाचे आगमन झाल्यानंतर, औपचारिक पूजा होईल. त्यानंतर, परमपूज्य संस्थापक संत श्री नाना महाराज यांच्या अध्यक्षतेखाली, गुरुकुंज मोझरीचे उपदेशक श्री प्रल्हादजी पारिसे दादा यांच्या शुभहस्ते आदरणीय राष्ट्रीय संत श्री तुकडोजी महाराजांच्या अस्थींचे विसर्जन केले जाईल. त्यानंतर दुपारी २ वाजता महामृत्युंजय यज्ञ व महाप्रसाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन आश्रमाचे अध्यक्ष श्री. प्रल्हाद धुर्वे, उपाध्यक्ष रामनाथ कालसर्पे, कोषाध्यक्ष राजेंद्र चौधरी, सचिव ओमप्रकाशजी गायधने आणि सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.



# वाळू तस्करीत दोन अधिकारी 'बळीचे बकरे' ; मोठे मासे गळाला लागणार का ?...

**महासागर जिल्हा प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१० :** मागील काही दिवसांत जिल्ह्यातील अवैध वाळू तस्करी चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. या वाळू तस्करी प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून लावून धरण्यात आली. त्यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशाने तुमसरच्या दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले.

भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी झालेली ही कारवाई योग्यच, यात दुमत नाही. पण स्वतःचे कातडे वाचविण्यासाठी काही लोकप्रतिनिधींनी आणि अधिकाऱ्यांनी या दोन अधिकाऱ्यांना 'बळीचा बकरा' करून कारवाई केली अशा चर्चांना आता जिल्ह्यात उधाण आलेले आहे. दरम्यान चौकशी समितीच्या अहवालाची शंभर टक्के अमलबजावणी झालेली आहे का? या प्रकरणात गोवलेले मोठे मासे गळाला लागणार का? असे प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार चरण वाघमारे यांनी उपस्थित केले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील वैनगंगा आणि बावनथडी नदीच्या उच्च गुणवत्ता असलेल्या चंदेरी रेतीला जिल्ह्याबाहेर प्रचंड मागणी आहे. यातूनच कोट्यवधींच्या कमाईसाठी अवैध रेती तस्करी फोफावली. जिल्ह्याबाहेर आणि परराज्यात मोठ्या प्रमाणात रेती उत्खनन करून तस्करी करण्यास सुरुवात झाली. शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवून प्रशासनाच्या डोळ्यांदेखत रेतीची चोरी आणि रेतीची अवैध वाहतूक सुरू आहे. दरम्यान सत्ताधारी पक्षाचे आमदार राजू कारेमोरे यांनी रेती चोरी आणि खनिज वाहतुकीत 'महसूल मंत्र्यांपासून गृहमत्रांपर्यंत देणे घेणे' असल्याचा घणाघाती आरोप करणारे एक पत्र तहसीलदारांना लिहिले आणि रेती तस्करी हा विषय पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला.

अवैध तस्करीत कोणकोणते अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी अधिक सक्रिय आहेत, कोण किती पैसे घेतो, कोणत्या अधिकाऱ्यापासून कुणापर्यंत कमिशन पोहोचविले जाते अशा अनेक विषयांवर चर्चा रंगू लागल्या. अर्थसंकल्पीय अधिवेशनातही रेती तस्करीवर विरोधकांनी रान उठवले. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) गटाचे नेते जयंत पाटील, काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी अधिवेशनात हा विषय उचलून धरला. आमदार नाना पटोले यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे कॉल रेकॉर्ड व सीडीआर तपासणीची मागणी करत 'कुंपणच शेत खात असल्याचे' आरोप केले. आमदार पटोले यांच्या मागणीनंतर महसूल मंत्रालयातून २० मार्च रोजी तुमसर विभागीय कार्यालयात चौकशीचे आदेश धडकले. त्यानंतर अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमध्ये खळबळ उडाली. चौकशी सुरू झाली.

तुमसर उपविभागात अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतुकीला तुमसर महसूल विभाग दोषी असल्याचा ठपका ठेवत अखेर काल तुमसरचे उपविभागीय अधिकारी दर्शन निकाळजे व तहसीलदार मोहन टिकले यांना निलंबीत करण्यात आले. या दोन अधिकाऱ्यांवर निलंबनाच्या कारवाईनंतर आता अनेक चर्चांना ऊत आलेला आहे. दरम्यान, शासनाच्या चौकशी समितीच्या अहवालाची शंभर टक्के अमलबजावणी झालेली आहे काय? आमदार कारेमोरे यांनी या रेती चोरीत अनेकांचे हात ओले झाल्याचे म्हटले होते मग त्यांची निष्पक्ष चौकशी झाली का? अनेक लोकप्रतिनिधींच्या आशीर्वादाने हे सर्व सुरू असताना दोनच अधिकारी जबाबदार कसे? या तकलादू कारवाईमुळे अवैध रेती व्यवसाय संपुष्टात येणार का? ज्या लोकप्रतिनिधींचे रेती तस्करीत साटेलोटे आहे त्यांचीही चौकशी होणार का? असे अनेक प्रश्न शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष चरण वाघमारे यांनी आता उपस्थित केले आहेत.

तुमसर-मोहाडी तालुक्यात अवैधरित्या वाळूचे उत्खनन व वाहतूक हा कोणत्याही एका विभागाच्या सहमतीने चालणारा विषय नसून हा एक संघटीत गुन्हेगारीचा प्रकार आहे. जिल्ह्यातील अवैध रेती वाहतुकीवर आळा घालण्याकरीता शासनाच्या अनेक विभागाची जबाबदारी आहे. त्यात महसूल, खनिकर्म, पोलीस, आरटीओ या सर्वच विभागांची महत्वाची जबाबदारी आहे आणि त्याहून महत्वाची भूमिका म्हणजे स्थानिक लोकप्रतिनिधी यांची. असे असतांना तुमसर-मोहाडी तालुक्यातील अवैध रेती वाहतुकीला फक्त दोनच अधिकारी तेवढे जबाबदार कसे? असू शकतात असा प्रश्न चरण वाघमारे यांनी उपस्थित केला आहे. या अवैध रेती व्यवसायात आणखी कोणत्या शासकीय विभागाच्या अधिकारांचा सहभाग आहे, या व्यवसायातील रेती माफीया व लोकप्रतिनिधी यांचे संबंध उघड करायचे असल्यास चौकशी समितीने रेती व्यवसायाशी संबंधीत सर्व शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांचे फोन कॉल रेकॉर्डची तपासणी करण्याची मागणी चरण वाघमारे यांनी केली आहे. या कारवाईनंतर रेती तस्करीत सक्रिय असलेलेच चौकशीची मागणी करून नामानिराळे होण्याची धडपड करीत करीत असून चोराच्या उलट्या बोंबा सुरू असल्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे.

## बपेरा आठवडी बाजारातून मोटार सायकलची चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा :** महेश झनकलाल भलावे रा. डोंगरीया ता. खैरलांजी जि. बालाघाट हा हाडगे यांचे दुकानासमोर त्याने आपली मोटार सायकल लॉक करून ठेवली होती. त्याची मोटारसायकल पेंशन प्रो क्र. एमएच ३५ वु ५०४६ ने बपेरा येथे आठवडी बाजार करण्यासाठी आला होता. बपेरा येथील अमरीश अज्ञात चारोनने संधी साधून ती चोरून नेली. पोलीस स्टेशन सिहोरा येथे गुन्हा नोंद असून तपास श्रेणी उपनिरीक्षक मेश्राम करीत आहेत.

## बारव्हा येथे आज पासून सलग चार दिवस मुलनिवासी मेळावा

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर, दि. १० :** मुलनिवासी संघ तथा मुलनिवासी सभ्यता संघ यांच्या संयुक्त विद्यमाने- राष्ट्रपिता जोतीराव फुले तथा राष्ट्रनिर्माते बाबासाहेब डॉ. भिमराव आंबेडकर यांच्या सयुक्त जयंती दिनांचे औचित्य साधून बस स्टँड रोड बारव्हा प्रवेश द्वार लगतच्या खुल्या मैदानात .' राष्ट्रव्यापी मुलनिवासी मेळाव्या' अंतर्गत चार दिवसीय मुलनिवासी मेळाव्याचे आयोजन संपन्न होत आहे.

या मेळाव्यात पथ संचलन, प्रबोधनात्मक शाहिरी संमेलन , प्रबोधन सत्र, 'शब्दाचार' काव्यवाचन आणि गणसभा या स्वरूपात कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. शुक्रवार, दि.११ एप्रिल २०२५ ला सकाळी ८.३० वाजता पथ संचलन तर सकाळी१०.३० वाजता या मेळाव्याचे उद्घाटन अखिल भारतीय रोजगार हमी कामगार वेल्फेअर संघटना महिला विंग लाखांदूर तालुका अध्यक्षा वैशाली शिंदे यांच्या हस्ते संपन्न होत आहे.

दुपारी २.३० वाजता मुलनिवासी कर्मचारी कल्याण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष पुष्पराज दहिवले यांच्या अध्यक्षतेखाली ' राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुलेंचा सत्यशोधक दृष्टीकोण समाजात रुजविण्यासाठी आपण काय प्रयत्न करतो.' या विषयावर प्रबोधन सत्र तर सोमवार, दि.१४ एप्रिल २०२५ ला काव्य वाचन समारोहा नंतर लगेच ' केवळ माझ्या नावाचा जयजयकार करण्यापेक्षा मी सांगितलेले रचनात्मक कार्य करा' या विषयावर गण सभेचे आयोजन बामसेफचे राज्य कार्यकारणी सदस्य ए.बी.मरसकोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात येणार आहे.

या दरम्यान शनिवार व रविवार अनुक्रमे दि. १२ व १३ एप्रिल २०२५ ला प्रबोधनात्मक शाहिरी संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या दोन दिवसीय समेलनात दोन हजार हुन अधिक राज्य स्तरिय प्रमाणपत्राचे वाटप होण्याची शक्यता वर्तविल्या जात आहे.या संमेलनाला यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय तथा राज्य स्तरिय पदाधिकारी यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. बामसेफ महाराष्ट्र राज्य महासचिव प्रा.मधुकर मेश्राम, मुलनिवासी संघ महाराष्ट्र राज्याध्यक्ष अजय पशिने, संदीप रामटेके संविधान प्रबोधक, मुलनिवासी संघाचे राज्य महासचिव दिपक मेश्राम या सोबतच लाखांदूर तालुक्याचे तहसिलदार वैभव पवार, नायब तहसीलदार अखिलभारत मेश्राम, लाखांदूर तालुक्याचे पोलिस निरीक्षक सचिन पवार, बारव्हा गावचे प्रथम नागरिक रंजित नैताम, उपसरपंच अनिल कापगते , येथिल ग्राम विकास अधिकारी डी. बी. कापगते, बारव्हा येथिल तंटामुक्त अध्यक्ष बाबुराव बुद्धे,, पोलिस पाटील दिलीप सलामे, बहुजन एकता मंचचे सदस्य डॉ. अशोक नंदेश्वर, दैनिक देशोन्नतीचे पत्रकार विलास मेश्राम, दैनिक महासागरचे लाखांदूर तालूका प्रतिनिधी कमलेश बोरकर, दैनिक नवजिवनचे जिल्हा प्रतिनिधी सुधिर शेंडे यांचा प्रामुख्याने समावेश आहे. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी परिसरातील जनतेनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे. असे आवाहन मुलनिवासी संघाचे जिल्हाध्यक्ष काशिनाथ शेंडे, मुलनिवासी सभ्यता संघाचे जिल्हाध्यक्ष प्रा. राजकुमार सुखदेवे आणि मुलनिवासी संघाचे जिल्हा सचिव प्रा. रमेश जांगळे, तसेच मुलनिवासी सभ्यता संघाचे भंडारा जिल्हा सचिव निशिकांत मेश्राम यांनी केले.

## नवजीवन विद्यालयात भगवान वर्धमान महावीर जयंती साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.१० :** नवजीवन विद्यालय अँड ज्युनि. सायन्स कॉलेज जमनापूर / साकोली येथे भगवान वर्धमान महावीर यांची जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक डॉ. लोकांनद नवखरे प्रमुख अतिथी सौ. चंद्रकला बिसने, प्रकाश बडवाईक, दीपक गहाणे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वर्धमान महावीर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थानी महावीर यांच्या जीवनातील त्याग, शांती आणि अहिंसा या मूल्यावर आधारित भाषणे दिली. तसेच वर्धमान महावीर यांच्या जीवनावर निबंध स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा, चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षीय भाषणातून डॉ.लोकांनद नवखरे यांनी सांगितले की 'भगवान महावीर यांनी जगाला सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह यांच्या पंचमहावृत्तांचे महत्त्व पटवून दिले. त्यांचे विचार आजही आपल्याला जीवनात योग्य मार्ग दाखवतात.' त्यांनी विद्यार्थ्यांना या मूल्यांचे आचरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन दिलीप चौधरी यांनी केले तर आभार मुकेश येसनसुरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शाळेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

## सिहोरा येथे धर्मार्थ प्याऊचा शुभारंभ

### भारतीय जनता पार्टी धर्मार्थ प्याऊ




**महासागर प्रतिनिधी**

**सिहोरा ,दि.१० :** श्रीराम जन्मोत्सव सोहळा व भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधून सामान्य जनतेच्या हितार्थ व प्रवाशांच्या सोयीस्तव सिहोरा बस स्थानकावर दरवर्षी प्रमाणे धर्मार्थ प्याऊचा शुभारंभ करण्यात आला.

माजी शिक्षण सभापती धनेंद्र तुरकर व मित्रपरिवार यांच्या सौजन्याने शुभारंभ करण्यात आलेल्या धर्मार्थ प्याऊचा शुभारंभ सेवानिवृत्त शिक्षक दामोदर नंदनवार यांचे हस्ते फीत कापुन करण्यात आले. यावेळी भाजयुमोचे जिल्हा सचिव गजानन निनावे, बाला तुरकर, अरविंद पटले, मनोज पटले, लोकचंद तुरकर, धरम बिसने, तेजराम ठाकरे, बालू बिसने, दिनेश कामथे, योगेश तुरकर, छत्रपती तुरकर, जयंत तुरकर, पप्पू तुरकर, विनोद गौतम, पंकज शुक्ला, गोलू गौतम, राजू मेळेवार, कमलेश पात्रे, मनोज जयस्वाल, कालु निनावे, नरेंद्र तुरकर, अमर पटले, राजेंद्र पटले, सचिन तुरकर, संतोष शरणागत, योगेश तुरकर व भाजप कार्यकर्त्यांसह इतर सहकारी

## संकटमोचन श्री हनुमान मंदिर, जेल रोड, भंडारा येथे हनुमान जन्मोत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१० :** संकटमोचन श्री हनुमान मंदिर, संताजी मंगल कार्यालय जवळ जेल रोड, भंडारा येथे हनुमान जन्मोत्सव शनिवार दि. १२/०४/२०२५ रोजी जन्मोत्सव करण्यात येणार आहे.

शुक्रवार, दिनांक ११/ ०४/ २०२५ला सांय ७.०० ते ९.०० सुंदर कांड पठण रात्री १०.०० वाजता रुद्राभिषेक आणि श्रृंगार चैत्र पौर्णिमा शनिवार, दिनांक १२/०४/२०२५ला सकाळी ११.०० से १.०० जन्मोत्सव, पूजन आणि महाआरती दुपारी १.०० ते ५.०० हवनपूजन भजन संध्या ६.०० महाआरती संध्या ७.००ते ११.३० महाप्रसाद(भारतीय बैठक) रात्री १२.०० वाजता आरती व समारोप आणि सर्वभक्तगणांना नम्र विनंती आहे की, हनुमान जयंती उत्सव निमित्य सर्व कार्यक्रमला उपस्थित राहण्याचे आवाहन हनुमान मंदिर समितीचे सदस्य राजेश राऊत, अरूण आनंद, अनिल आनंद, पंडित सोनू तिवारी, शितल तिवारी, दिनेश शर्मा, लवाजी फुलबांधे, सुनील हळदे, सुधाकर फाये, सुनील मोहबे, अनिल घोगरे, विक्की सेलोकर, महेंद्र सेलोकर, मुंकूद आनंद, राजेश परतवार, सतवान गौरी, सचिन फाये, अनिल तिवारी, दिलीप व्यास, नारायन चोले, सिंधू सेलोकर, सुषमा तिवारी, ज्योती बावनकर, कल्पना फुलबांधे, नेहा आनंद, स्वेता सेलोकर, ममता सेलोकर यांनी केले आहे.

## मदनकर महाविद्यालय ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक जीवन संजीवनी - आ. राजू कारेमोरे




**महासागर प्रतिनिधी**

**वरठी ,दि.१० :** नवनिर्माण शिक्षण संस्था द्वारा संचालित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर सलग्नित स्व. पर्वताबाई मदनकर कला व वाणिज्य महाविद्यालय वरठी. मदनकर महाविद्यालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाची संजीवनी आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाच्या इमारत उद्घाटनिय भाषणात तुमसर मोहाडी विधानसभा क्षेत्राचे लोकप्रिय आमदार राजूभाऊ कारेमोरे यांनी असे प्रतिपादन केले.

याप्रसंगी महाविद्यालयाच्या नवीन इमारतीचे उद्घाटक म्हणून आ. राजूभाऊ कारेमोरे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जि. प. उपाध्यक्ष एकनाथ फेंडर प्रमुख अतिथी वरठी ग्रामपंचायत मधील सरपंच चांगदेव रघुते उपसरपंच अनिता गजभिये डॉ. उल्हासजी फडके डॉ.हेमंतकुमार देशमुख ,शुभांगी सुनील मेंढे, सुधाकर मदनकर संस्थेचे सचिव प्रशांत वाघमारे संस्थेचे कोषाध्यक्ष अँड कैलास भुरे पं. स. माजी सभापती रितेश वासनिक ,रातुम नागपुर विद्यापिठ समाजशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा.डॉ.बबन मेश्राम आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन भाषणात आ. राजूभाऊ कारेमोरे यांनी आमच्या ग्रामीण भागामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोय त्या काळामध्ये नव्हती परंतु २००१ पासून आमच्या ग्रामीण भागात स्व. पार्वताबाई मदनकर महाविद्यालय याची स्थापना करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध झाली त्यामुळे विद्यार्थी शिकू लागलेत. यासाठी संस्थेचे अध्यक्ष मिलिंद जी मदनकर यांचे त्यनी आभार मानले कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष मिलिंद मदनकर यांनी महाविद्यालयाच्या २९ जून २००१ स्थापनेपासून तर आतापर्यंतचे संपूर्ण माहिती आपल्या प्रास्ताविकात सांगितली कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा परिषद भंडाराचे उपाध्यक्ष एकनाथ फेडर यांनी आमच्या ग्रामीण भागात शिक्षणाची साधने उपलब्ध नव्हती. महाविद्यालय अस्तित्वात नव्हते परंतु अलीकडच्या काळात महाविद्यालयाच्या स्थापनेमुळे आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी हा शिकू लागले या शिक्षणाची संधी सदर महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना प्राप्त करून दिले.याप्रसंगी येशस्वी विद्यार्थी कु. ऋतुजा ठवकर आशिष वंजारी सत्कार करण्यात आले . त्याचप्रमाणे नवनिर्माण शिक्षण संस्था व स्व. पार्वताबाई मदनकर कला व वाणिज्य महाविद्यालय वरठी याच्याकडून नव निर्वाचित ग्रामपंचायत सरपंच व सदस्य यांचा सत्कार करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता महाविद्यालयातील कर्मचारी डॉ. नितीन नवखरे डॉ. मधुकर गोमासे डॉ.रजनी भुरे डॉ. शिवकुमार हटवार डॉ मनोज भालेकर डॉ. छाया देशमुख प्रा संगीता वखालकर प्रा मंगेश काटेखाये ,गजानन तुमसरे ,लुकेश बुरडे ,महेश मदनकर ,अमोल समरित ,अनिल रामटेके ,मुरली भुरे ,नितीन वासनिक ,अर्चना छोडेस्वार कार्यक्रमाचे संचालक डॉ. विद्या ढोके तर आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष बोरकर यांनी मानले.



## महालगाव / सु. येथे भागवत सप्ताह प्रारंभ

**महासागर प्रतिनिधी**

**महालगांव / सु. :** साकोली तालुक्यातील महालगाव/ सु.येथे श्रीराम नवमीचे आचित साधून श्री सार्वजनिक देवस्थान कमिटी व समस्त ग्रामवासीच्या सहकार्याने सार्वजनिक हनुमान मंदिर महालगावच्या आवारात संगीतमय श्रीराम कथा सप्ताह ,ज्ञानयज्ञ ग्रामगीता ,संत कथा सप्ताह ,प्रवचनकार ह.भ.प बेनीराम भट महाराज आणि संचाद्वारे दि. ६ते १२ एप्रिल २०२५ पर्यंत संगीतमय श्रीराम कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे .यामध्ये दररोज सामूहिक हरिपाठ ,रामधून , गाव प्रर्दषिना ,भागवत प्रवचन साधना प्रवचन ९ ते ११ वाजेपर्यंत राहील .या कार्यक्रमाला उपस्थिती मान्यवर आ. नानाभाऊ पटोले ,खा. डा. प्रशांत पडोळे ,माजी सभापती मदनभाऊ रामटेके ,उपसभापती करूनाताई वालोदे, अविनाशभाऊ ब्राहमणकर, सरपंच नंदकिशोर कावळे ,सेवा सहकारी संस्था अध्यक्ष गिरधारी खरकाटे ,तमुअध्यक्ष मारुती मारवाडे, पोलीस पाटील भारत शेंडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत .तरीपण सर्व भाविक भक्त ग्रामवसीयांनी या भागवत श्रीराम कथेला उपस्थित राहून



काल्याचे व महाप्रसादाचे लाभ घ्यावा असे आव्हान महालगाव येथील सार्वजनिक देवस्थान समितीचे अध्यक्ष सरपंच नंदकिशोर कावडे व सर्व सदस्य यांनी केले आहे.

## डोंगरदेव ते मांडवी रस्ता तात्काळ दुरुस्त करा

### भाजपा जिल्हा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**मोहाडी ,दि.१० :** तालुक्यातून कोका अभियारण्यातून तिरोडा ते भिलेवाडा जाणारा जी. प्र. क्र. १६ हा मार्ग डोंगरदेव ते मांडवी या गावादरम्यान अतिशय खराब झाला असून जनप्रतिनिधी व अधिकारी यांच्या उदासीन धोरणाने या मार्गावरून ये जा करणाऱ्यांचे मोठे हाल होत असून हा मार्ग त्वरित दुरुस्त करावा , अशी मागणी भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांनी केली आहे. मुंबई ते हावडा हायवे क्रमांक ६ पासून सुरू होणारा जिल्हा मुख्य मार्ग क्रमांक १६ हा मांडवी खडकी करडी ते बीरसी (तिरोडा) येथे जाऊन मनसर ते गोंदिया या हायवेस जाऊन हा मार्ग मिळतो हा मार्ग तिरोडा ते भंडारा येथे येण्यासाठी सर्वात कमी अंतराचा मार्ग असल्यामुळे प्रवास करणारे लोक या मार्गास आपली पसंती दाखवितात व या मार्गाने ये जा करतात हा मार्ग कोका अभयारण्यातून ढिवरवाडा ते मांडवी २ की.मी. अंतर जातो कुऱ्हाळ बंदी आल्याने व कोका अभयारण्य घोषित झाल्याने झाडांची कत्तल होणे बंद आहे व हा जंगल दिवसेंदिवस घनदाट होत आहे , या जंगलात वन्यप्राण्यांची मोठी वर्दळ आहे वन्यप्राणी दिवसा ढवळ्या व रात्री मोठ्या प्रमाणात जंगलातून ढिवरवाडा व मांडवी येथील शेत शिवारात चरण्याकरिता व वैनगंगा नदीकडे दिवसाढवळ्या रोड ओलांडून जातात . वन्यप्राण्यांच्या उपद्रवामुळे या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी आपली हजारो एकर शेती पडीत ठेवली आहे . हा परिसर नदी काठावर आहे पाण्याची मुबलकता आहे जमीन सुपीक आहे परंतु वन्य प्राण्यांच्या उपद्रवा मुळे शेतकरी आपल्या शेतात पीक घेऊ शकत नाही त्या वन्य प्राण्यांच्या भीतीमुळे रात्री वाहन चालविणारे व्यक्ती थोड्या वेगाने वाहन चालविण्याचा प्रयत्न करतात परंतु खड्डेच एवढे मोठे आहेत की टू व्हीलर किंवा चार चाकी वाहन या मार्गाने दहाच्या स्पीडच्या वर वाहन चालवू शकत नाही हा रस्ता गिट्टी उघडलेला खड्डे पडलेला असल्यामुळे वाहनांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे . अनेक वाहने पंचर सुद्धा होतात या मार्गास दुरुस्त करावे म्हणून अनेक वेळा आंदोलन रास्ता रोको निवेदन सर्वच काही करण्यात आले परंतु कुंभकर्णी झोपेत असलेले प्रशासन अजून जागे झाले नाही त्यामुळे हा मार्ग अजूनही नादुरुस्त आहे.

देशाचे बांधकाम मंत्री नितीन गडकरी हे रस्ते बांधकामा साठी प्रसिद्ध आहेत. विकास पुरुष म्हणून त्यांना संबोधले जाते. परंतु या रस्त्यास कुठले ग्रहण लागले आहे माहीत नाही. गडकरी साहेबांचा मानस साखर कारखाना याच मार्गावर येतो त्यांच्या कारखान्यात उस नेणाऱ्या वाहनांना मोठा त्रास सहन करावा लागतो परंतु पाणी कुठे मुरते हे कळेनासे झाले असून गडकरी साहेबांनी याकडे लक्ष देणे गरजेचे



वाटते . १० कोटीचा डोंगरदेव ते ढिवरवाडा रस्ता मंजूर झाला असून त्या रस्त्याला वेळोवेळी निधी प्राप्त होत नसल्याने त्या रस्त्याचे काम कासव गतीने सुरू आहे. परंतु जंगलातून जाणारा रस्ता अजून मंजूर झाला नसून हा रस्ता तात्काळ मंजूर करावा तसेच सुरू असलेले काम वेगाने सुरू व्हावे व शासनाने त्यास निधी वेळोवेळी प्राप्त करून द्यावा व लोकांना होणाऱ्या शारीरिक व मानसिक त्रासापासून मुक्ती द्यावी , अशी मागणी भाजपा जिल्हा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विश्वनाथ बांडेबुचे यांनी केली आहे.

## भंडाऱ्यात महावीर जयंती उत्साहात साजरी

**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१० :** जैन धर्माचे २४ वे तिर्थंकार भगवान महावीर यांची जयंती भंडारा शहरात समस्त जैन समाजबांधवांनी एकत्रित येत उत्साहात साजरी केली.

महावीर जयंती निमित्त सकाळी मुख्य रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी 'अहिंसा हाच सर्वात मोठा धर्म ', 'जगा आणि जगू द्या' अशा घोषणा देण्यात आला. नंतर जैन साध्वीजींचे राजस्थानी भवन येथे प्रवचन झाले.

त्यांनी भगवान महावीर स्वामींच्या अहिंसा, सत्य, चोरी न करणे, ब्रहमचर्य आणि अविश्वास या तत्त्वांवर प्रकाश टाकला.

प्रसंगी मुले आणि महिलांनी महावीर जयंतीवर आधारीत एक सूंदर




नाटक सादर केले.

कार्यक्रमानिमित्त भंडारा, मोहाडी, जवाहरनगर, लाखनी येथून जैन समाजबांधव एकत्रित आले होते.

सदर कार्यक्रमाला अमित भलगट, राजकुमार बंब, महेंद्र जैन, देवेंद्र भंडारी, संतोष मुथ्था, सुरेश मुनोत, राजू गांधी, बबलू मुनोत, बाबा जैन, किशोर गांधी, धीरज गांधी, राजू मनोत, राजू शेट्टी, श्रमण भुरावत, भावेश धंधुकिया आदींचे सहकार्य लाभले.

**भंडारा, :** जिल्हा समादेशक होमगार्ड भंडारा कार्यालयाच्या नवीन पत्ता श्री.अशोक पेटकर, संत तुकडोजी महाराज वार्ड, एलआयसी कार्यालय, मागे, भंडारा येथून नवीन पत्ता सौ.वैशाली कातकडे बोरावणे यांचे खाजगी इमारतीमध्ये निर्वाण गल्ली, आझाद वार्ड, शोक हॉस्पीटल च्या समोर भंडारा येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

## दूरवस्था, मासळ - नवेगाव रस्त्याचा वाली कोण ?

*** दोन किलोमीटरचा रस्ता उखडला, जनतेचे हाल**

*** तालुक्यांना जोडणारा हा मार्ग असूनही दुर्लक्षीत आहे.**

**महासागर प्रतिनिधी**

**लाखांदूर ,दि.१० :** पतनी या दोन तालुक्यांना जोडणारा मासळ ते नवेगाव हा सुमारे दोन किलोमीटर लांबीचा रस्ता डांबर उखडल्यामुळे खड्डेमय बनला आहे. या रस्त्याकडे स्थानिक जन प्रतिनिधींसह प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे हा रस्ता वाहतुकीला त्रासदायक बनला आहे.

हा रस्ता लाखांदूर व पवनी या दोन तालुक्यांच्या सीमा भागावर असल्याने अनेक वर्षांपासून हा रस्ता दुर्लक्षित आहे.

या रस्त्यावरील डांबर पूर्णतः उखडला असून, दोन ते चार फुटाचे खड्डे जागोजागी पडलेले आहेत.

या रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे स्थानिक व बाहेरील नागरिक, तसेच विद्यार्थी, वृद्ध व जनसामान्यांना प्रवासाकरिता कठीण व प्राणघातक झाला आहे.

या रस्त्याने दररोज शेकडो चारचाकी, दुचाकी व जड वाहने धावत असतात. विशेष म्हणजे हा रस्ता आठवडी बाजार, बैंक, दवाखाना, शाळा, महाविद्यालयात शिक्षण घेण्याकरता ये-जा करणारे विद्यार्थी, शेतकरी व सामान्य नागरिकांना मासळला जाण्यासाठी महत्त्वाचा आहे.

दररोज या रस्त्याने ब्रहमी, नवेगाव, खैरी (तेलोता), अंबाडी, अतरी या गावांवरून विद्यार्थी व सामान्य नागरिक नियमित येतात, परंतु रस्त्याच्या बिकट अवस्थेमुळे नागरिकांना अनेकदा किरकोळ अपघातांना सामोरे जावे लागते. पावसाळ्यामध्ये शेतातील पाणी रस्त्यावर येत असल्याने या रस्त्याच्या दुर्गतीमध्ये आणखीनच भर पडत असते.

डांबरीकरणासाठी पावले उचलावे, अशी परिसरातील नागरिकांची मागणी आहे

## राज्यात पहिली आलेली 'रूंजी' हिचा शहरात पहिला सत्कार

### व्हीआयपी ग्रुप, साकोली मिडीया व फ्रिडमचा पुढाकार

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.१० :** अख्खा महाराष्ट्र राज्यात भारतीय प्रज्ञाशोध परीक्षेत साकोलीतील जिल्हा परिषद शाळेची दूसरीची विद्यार्थीनी रूंजी संग्रामे हीने प्रथम क्रमांक पटकाविला. व आता राज्यस्तरीय मंथन परीक्षेत राज्यात पाचवी आली. ही साकोलीसाठी अत्यंत गौरवाची बाब आहे.

करीता तीचा शहरात पहिला सत्कार येथील व्हीआयपी ग्रुप, साकोली मिडीया व फ्रिडम युथ फाऊंडेशन कडून शाळेत बुधवार ( ०९ एप्रिल ) ला भेटवस्तू देऊन केला. प्रसंगी सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

रूंजी सुधाकर संग्रामे जि. प. प्राथ. शाळा क्र. २ पंचशील वार्डची विद्यार्थीनी जाने. २०२५ च्या भारतीय प्रज्ञाशोध परीक्षेत २०० पैकी २०० गुण घेत राज्यात प्रथम आली. तसेच राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षेतही १५० पैकी १४२ गुण घेत महाराष्ट्रात पाचवी आली. करीता शहरातील अग्रगण्य व्हीआयपी समुहाचे अध्यक्ष अनिल कापगते, सदस्य अँड. मनिष कापगते, साकोली मिडीयाचे आशिष चेडगे, फ्रिडम युथ फाऊंडेशन अध्यक्ष किशोर बावणे यांकडून रूंजी संग्रामे हीचा शालेय भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन रूंजी संग्रामे चा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी जिल्हा परिषद शाळा केंद्र प्रमुख डि. ए. थाटे, से.नि.



शिक्षक डी. जी. रंगारी, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष योगराज मुंगमोडे, रूंजीची आई ललिता संग्रामे, शिक्षकवृंद पल्लवी लुथडे, पी. एस. देशपांडे, आशा वलथरे, लता इळपाते हे उपस्थित होते. याप्रसंगी मुख्याध्यापक डी. ए. थाटे यांनी सांगितले की, आज रूंजी संग्रामे हीच्या यशाबद्दल पहिली दखल घेऊन हे वृत्त संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध केले ते म्हणजे साकोली मिडीया, व्हीआयपी समुह व फ्रिडम युथ मिडियाचे जिल्हा परिषद शाळा वतीने विशेष आभार मानतो असे प्रतिपादन केले. या शहरातील पहिल्या सत्कार समारंभात संचालन शिक्षक उमेश भस्मे यांनी केले तर आभार सौ. लुथडे यांनी मानले.

## चैतराम विठोबाजी हातझाडे यांचे निधन



**सानगडी :** साकोली येथील चैतराम विठोबा हातझाडे, से. नी. लेखा अधिकारी (७०, प्रगती कालोनी, साकोली ) यांचे बुधवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे एक मुलगा, दोन मुली, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर त्यांच्या मूळ गावी चांदोरी / उसगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

## नाईक विद्यालयात भगवान वर्धमान महावीर जयंती उत्साहात संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**साकोली ,दि.१० :** वसंतराव नाईक विद्यालय चांदोरी येथे भगवान वर्धमान महावीर यांची जयंती कार्यक्रम साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक रामकृष्ण हारगुडे प्रमुख अतिथी दर्शन कटकवार गुणीराम चांदेवार उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात वर्धमान महावीर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी विदयार्थानी महावीर यांच्या जीवनातील त्याग, शांती आणि अहिंसा या मूल्यावर आधारित भाषणे दिली. तसेच वर्धमान महावीर यांच्या जीवनावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.



दर्शन कटकवार यांनी सांगितले की, 'भगवान महावीर यांनी जगाला सत्य, अहिंसा, अस्तेय, ब्रहमचर्य आणि अपरिग्रह यांच्या पंचमहावृत्ताचे महत्त्व पटवून दिले. त्यांचे विचार आजही आपल्याला जीवनात योग्य मार्ग दाखवतात.' त्यांनी विद्यार्थ्यांना या मूल्यांचे आचरण करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे संचालन मनीषा काशीवार यांनी केले तर आभार क्रीडा संघटक शाहेद कुरेशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वर्ग विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

## जिल्हयातील ७१३ शिक्षक प्रशिक्षणार्थींना पाच महिन्यांची मुदतवाढ

### आ. सुधाकर अडबाले यांनी दिलेल्या निर्देशानंतर तात्काळ वाढीव आदेश निर्गमित



**महासागर प्रतिनिधी**

**भंडारा ,दि.१० :** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कौशल्य योजने अंतर्गत जिल्हयातील शिक्षक प्रशिक्षणार्थींचा कार्यकाळ संपल्यानंतर कालावधी वाढविला असताना देखील सदर प्रशिक्षणार्थींना कार्यमुक्त करण्यात आले होते. ही बाब आमदार सुधाकर अडबाले यांच्या निदर्शनास येताच त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना दिलेल्या निर्देशानंतर तात्काळ वाढीव आदेश निर्गमित करण्यात आल्याने शेकडो प्रशिक्षणार्थींना दिलासा मिळाला आहे.

आमदार सुधाकर अडबाले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या समस्या निवारणार्थ ७ एप्रिल २०२५ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कौशल्य योजनेअंतर्गत १० मार्च २०२५ च्या शासन निर्णयानुसार प्रशिक्षणार्थी यांचा ६ महिन्यांचा कालावधी वाढवून ११ महिने करण्यात आलेला असताना सदर प्रशिक्षणार्थींना वाढीव आदेश न देता कार्यमुक्ततेचा आदेश देण्यात आला होता. त्यामुळे सदर बैठकीत प्रशिक्षणार्थी यांनी हा विषय मांडताच आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना वाढीव आदेश तात्काळ देण्यात यावा, असे निर्देश दिले. त्यावर ८ एप्रिल रोजी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण कौशल्य योजनेअंतर्गत शिक्षक प्रशिक्षणार्थींना ५ महिन्यांचा वाढीव आदेश शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांनी सर्व गटशिक्षणाधिकारी यांना दिला. या निर्णयामुळे जिल्हयातील ७१३ प्रशिक्षणार्थींना दिलासा मिळाला आहे. त्याबद्दल सदर प्रशिक्षणार्थ्यांना आमदार सुधाकर अडबाले यांचे आभार मानले आहे.

बैठकीला माजी आमदार व्ही. यू. डायगव्हाणे, शिक्षणाधिकारी (प्राथ.) रवींद्र सोनटक्के, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, जिल्हाध्यक्ष सुधाकर देशमुख, जिल्हा कार्यवाह राजेश धुर्वे, जिल्हा कोषाध्यक्ष धीरज बांते, नितेश बावणकर व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.


## महात्मा फुले एक सामाजिक क्रांतीची विचारधारा

**१ मे १८१८** ला पुण्याच्या शनिवार वाडयावरील पेशवाईचा ध्वज खाली उतरला आणि इंग्रजांचा जॅक ध्वज वर चढला . कोरेगांवच्या युध्दाची जी परीणीती होती. ''अत्यंत कष्टाने मिळविलेले मराठयांचे राज्य पेशवाईने फसवणुक करून वाईट मार्गाने गिळंकृत केले. परंतु मनुस्मृती यावर उभे असलेले पेशव्यांचे राज्य शेवटी धुळीला मिळाले. इंग्रजांनी तिथे आल्यानंतर बछयाच शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला हे नाकारता येत नाही इंग्लंड मधील लॉर्ड मेकॉले म्हणाले. तिथे जर राज्य करायचे असेल. तर इंग्रजी भाषेचा प्रचार आणि प्रसार शिक्षणाव्दारे व्हावा. त्या करीता त्यांनी झिरपणारी थेअरी मांडली. वरच्या वर्गाला जर आपण शिक्षीत केलं. तर आपोआपच खालचा वर्गापर्यंत शिक्षण जाईल.

या शिक्षण प्रणालीला सर्व प्रथम महात्मा ज्योतीबा फुले यांनी विरोध केला. ते म्हणाले 'झाडाची जर वाढ योग्यरितीने व्हायची असेल तर त्याच्या मुळाला पाणी द्यावे लागेल मग तो आपोआपच फुलेल, बहरेल' फुल्यांचा विचार सामाजिक, नैतिक या क्रांतीकारी मुल्यावर आधारीत होता.

समाजातील सामाजिक रचना ही अत्यंत विषमतेच्या उच्च निचतेच्या पायावर उभी होती. त्यामुळे समाजातील शुद्र जाती हयात माणुस पणापासून वंचित होत्या. एखादया पशु पेक्षाही त्या अवहेलने व अपमानीत जीवन जागत होत्या. यासाठी सर्व प्रथम सांस्कृतिक परीवर्तनाची स्थापना करतांनी १८७३ ला त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.

महात्मा फुले हे माळी समाजाचे भाजी व फळे फुलविणार व पिकविणारे त्यांच्याही जातीचा दर्जा मराठा कुणबीच होता. परंतु सामाजिक व्यवस्था ही कुणबी आणि पिठ कुटल्याने सुधारते याप्रमाणे तेही यामुळे जातीयतेच्या विषमतेने होरपळून निघाले. एकदा ते सखाराम परांजपे या ब्राम्हण मित्राच्या लग्न कार्यात गेले. आणि वराती सोबत येत होते. परंतु त्यांचा स्पर्श होता. इतर ब्राम्हणांनी त्यांना वराती बाहेर काढल त्यावेळी त्यांचे वय १९ वर्षांचे होते. त्यांनी वडीलास सांगितले वडील म्हणाले अरे आपण शुद्र आहोत देवानीच आपल्याला या अवस्थेत



पाठविले आहे . बर झालं त्यांनी तुला काही मारपीट न करता घरी पाठविले. अन्यथा काहीतरी विपरीत घडल असतं. या घटनेचा त्यांच्या मनावर परीणाम झाला आणि याबाबत शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. कारण कोणत्याही समाजाला मानसिक गुलामगीरी विरूध्द बंड करायचे असेल तर ज्ञानबळ द्रव्यबळ व मनुष्यबळ या तिन्ही बळांची नितांत गरज असते शिक्षण व ज्ञान ते फक्त उच्च जातीतच होते. त्यामुळे समाजातील ९० टक्के स्त्री व शुद्र हे मानसिक गुलामगीरीत होती. व धर्मशास्त्राची मान्यता होती. म्हणून महात्मा फुलेंनी जाळूनीया टाका मनुमत अशी घोषणा केली.

तरच हिंदू संस्कृतीच्या जाती रचनेचे उच्चाटन करता येईल व समाजाचे पुनरूज्जीवीकरण करता येईल. महात्मा फुलेंचा जन्म १८२७ ला माळी कुटुंबात झाला १८३३ साली त्यांचे शिक्षण तात्पुरते बंद झाले.

१८४१ साली त्यांचे शिक्षण पुन्हा सुरू झालेआपली तरूण पत्नी सावित्रीबाई फुले यांनाही त्यांना वाचावयास शिकविले. थॉमस पेन लिखीत मानवाचे हक्क या ग्रंथातील त्यांनी वाचन केले. व त्यामुळे प्रभावित झाले . १८४८ ला स्त्रीयांकरीता पहीली मुलींची शाळा काढली.

(त्यात सर्व ब्राम्हण वर्गातील मुली होत्या) परंतु ज्योतीबा हे जे जे वंचीत आहेत.

दुर्बळ आहेत, दाबलेले आहेत अशा सर्व व्यक्ती विषयी अपार करूणा घेवून जगणाने महात्मा फुले १८७३ ला त्यांनी गुलामगीरी हे पुस्तक लिहले. १८८४ च्या मे महीन्यात फुले आणि लोखंडे यांनी साळी - माळी तेली व इतर जमातीच्या ब्राम्हणी पुजाऱ्यांना बाजुला सारून धार्मिक व आर्थीक प्रश्नांकरीता एकत्रीत केले व संघर्ष उभा केला १८८८ ला मुंबई येथ त्यांना महात्मा ही पदवी देवून त्यांचा सन्मान करण्यात आला. हे सारे कार्य त्यांनी समाजात रूजविण्याचा प्रयत्न केला.

त्यांची कृती भाषा व लिखान ही एकरूपता दर्शविते आज स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत इतिहासातील पुरावे शोधले जात आहेत. परंतु शिवाजी महाराजांच्या समाधीचा शोध कुणी घेतला व कसा घेतला ग्राम भटांनी अरे काय शुद्रा या कुणबट राज्याची समाधी शोधतोस फुले वाहतोस आधी माझी दक्षिणा दे या शब्दाने अपमानित झालेले.

रागाने थरथरले आणि पुण्यास परत आल्या नंतर शिवाजी महाराजांवर पोवाडा लिहीला इतिहासात त्याची नोंद आहे.

समानतेच्या दृष्टीने जाती रचना व एकाधीकार शाही यावर आधारलेली कुटुंबरचना व समाजरचना अत्यंत घातक आहेजिथे समाज एकमय आहे. तेच खरेखुरे राष्ट्र होय.

भारतीय संस्कृतीमध्ये वैदीक संस्कृती ती पायाभूत संस्कृती आहे.

असे कितीही ओरडले तरीही वेद हे भेद आहेत. हे सांगणारे महात्मा फुलेच होत. भारतात शेतकरी अत्यंत दारीद्रय आणि अज्ञानीत खितपत पडला. तो हया अवनितीतून बाहेर यावा. या प्रश्नाची जाणीव व्हावी म्हणून महात्मा फुलेंली राष्ट्रीय सभेवर मोर्चानेला आजही कालचे प्रश्न अधिक उग्र स्वरूपात समोर येत आहेत. या सर्वांना योग्य मार्गदर्शन भारतीय संविधानच करेल. कारण हे संविधान म्हणजे फक्त स्वातंत्र्य लढयातील जाणीवाची जंत्री नाही तर त्यात श्रमण संस्कृतीने अवलंबिलेल्या जीवनाची रूपरेखा आहे.

त्यात चार्वाका पासून गौतम बुध्द संत तुकाराम संत कबीर, ज्ञानेश्वर, शिवाजी महाराज, महात्मा फुले, लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, स्वामी विवेकानंद, राजा राममोहन राय, असे अनेक संत आणि महात्मे तत्वज्ञानी आणि बुध्दीवादी यांच्या शिकवणुकीचे प्रतिबींब त्यात आहे.

समानता, एकता, बंधुता, सामाजिक न्याय व राष्ट्रीयता, धर्म निरपेक्षता याची शिकवण देणारे संविधान उद्याच्या उज्वल राष्ट्राचे मार्गदर्शन ठरेल

**हर्षल मेश्राम**

**मो . नं. ९८६०९५५६०६**


RNI No.- MAHAMAR-2010/35801 **महासागर भंडारा**

**मालक, मुद्रक, प्रकाशक** - श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर - १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, गांधी चौक समोर, भंडारा येथे प्रकाशित केले. **संपादक**- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन - ०७१२-२७६७६२८- ९३७३११७०४२ * स्थानिक संपादक-**सुरेश लक्ष्मण कोटगले,** फोन -८७९३१९१२१३ * (पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांचेवर राहील.)

